**भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र**

(दुपार)

जा.क्र. १५५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०३/०३/२०१७

**१) वाहनाचा अचानक ब्रेक दाबल्याने समोरील वाहनाचा काच फुटल्याने अश्लिल शब्दात शिविगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०२/०३/२०१७ चे १८.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी राजेन्द्र गोपालप्रसाद मुखर्जी वय ४५ वर्ष, रा. चिखला हा मुलाच्या भेंटीसाठी नागपुर येथे दिनांक २८/०२/२०१७ ला यातील आरोपी हा वाहनावर चालक म्हणुन काम करतो ते वाहन भांडयाने नेले असता प्रवासा दरम्यान आरोपीने वाहनाचा अचानक ब्रेक दांबल्याने वाहनाचे समोरील काच फुटला याकारणावरुन आरोपीने फिर्यादीचे दवाखान्या समोर येवुन 'वाहनाचे फुटलेल्या काचाचे पैसे भरुन दे' असे म्हणुन भांडण करुन सार्वजनीक ठिकाणी अश्लिल शब्दात शिविगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम २९४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तांडेकर पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**२) दारूडया वाहन चालकावर कारवाई:—**

दिनांक ०२/०३/२०१७ चे १०.३१ वा. दरम्यान यातील आरोपीने आपल्या ताब्यातील मोटार सायकल क्र. एमएच ३१/ व्ही ७४५७ ही दारु पिऊन दारुचे नशेत चालवितांना मिळुन आल्याने त्याचे ब्रीथ अल्कोहोल ॲनालायजर मशीनव्दारे चेक केले असता अल्कहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. वानीशा भंडारा याचे रिपोर्ट वरुन पोस्टे भंडारा येथे कलम १८५ (१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. गजभिये पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**३) प्रकृती अचानक बिघडल्याने औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :—**

दिनांक ०२/०३/२०१७ चे १९.५० वा. दरम्यान यातील मृतक सुनिल प्रभुदास खोब्रागडे वय ४० वर्ष, रा. मेंढा याची प्रकृती बिघडल्याने त्यास औषधोपचारा करीता सा.रु.भंडारा येथे अती दक्षता विभागात नेले असता डॉ. ने तपासुन मरण पावल्याचे घोषीत केल्याने डॉ. मेमो वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बहादुरे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहे.

**४) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक ०२/०३/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ८६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०३, तीन सिटर वाहनांवरती ०७ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ७६ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

**सपोनि. के. एम.हत्तीमारे**
**जि. वि. शा भंडारा करीता**
**दुरध्वनी.क्र. ९४२२८३२१७८**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहिती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.